मायबोली मेळावा वृत्त

वर्ष चौथे / वृत्त २ २३ मार्च २०१२

संपर्क: newsletter@mmtbusa.org

नमस्कार,

नूतन वर्षाभिनंदन आणि गुढीपाडव्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शिषिर सरला ,फुटे पालवी... होता वसंताचा स्पर्श,
रंग विरले, होळी शमली... येता चैत्री पाडवा, पसरे सर्वत्र हर्ष!

मऊसूत पुरणपोळीची अवीट गोडी चाखविणाऱ्या होळीला आणि विविध रंगांची उधळण घेऊन येणाऱ्या रंगपंचमीला निरोप देऊन आपण सर्वजण वसंत ऋतुराजाचे मोठ्या उत्साहाने स्वागत करतो.

आपल्या सर्व वाईट प्रवृत्ती, वाईट विचार होळीमध्ये जाळून नष्ट करुन येणाऱ्या नवीन वर्षाची नवी सुरुवात आज साडेतीन मुहूर्तांपैकी एका शुभ मुहूर्ताने म्हणजेच गुढीपाडव्याने होते आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा. या दिवशी शालिवाहन शकाचे नवे वर्ष सुरू होते. लंकाधिपती रावणाचा वध करुन आणि चौदा वर्षांचा वनवास संपवून प्रभू रामचंद्र सीतामातेसह विजयी होवून आपल्या अयोध्या नगरीत परतले. अयोध्यावासीयांनी आपल्या लाडक्या रामरायाचे घराघरांवर गुढ्या, तोरणे उभारून स्वागत केले, ते याच दिवशी! प्राचीन रामायणातील ही कथा आपल्या सर्वांच्याच परिचयाची आहे, नाही का? पण गुढीपाडव्याच्या दिवशी गुढ्या उभारण्याच्या प्रथेचे मूळ हे महाभारतात आहे. माझे सासरे श्री. प्र. के. फडणीस यांच्या वाचनात हा संदर्भ आला. ती छोटीशी पण मनोरंजक कथा आजच्या या खास दिवशी आपल्या माहितीसाठी देते आहे.

उपरिचर नावाचा एक धर्मशील राजा होऊन गेला. व्यासांची माता सत्यवती ही या उपरिचर वसूची धीवर स्त्रीपासून झालेली कन्या होय. हा या उपरिचर वसूचा महाभारताशी असलेला संबंध. आपल्या उग्र तपश्चर्येने हा राजा एक दिवस इंद्रपदाला योग्य होईल या भीतीने देवांनी त्याला तपश्चर्येपासून परावृत्त केले. इंद्राने त्याला, 'तू पृथ्वीवर नित्य तत्पर राहून धर्मपालन व धर्माचा प्रतिपाळ कर, 'चेदि' देश जिंकून त्याचा राजा हो' असे सांगितले. आपले स्फटिकाचे गगनविहारी विमान त्याला दिले व वैजयंती माळ दिली. आपली नित्य आठवण राहावी म्हणून सज्जनांचा प्रतिपाळ करणारी एक कळकाची काठी त्याला दिली. इंद्राचा मान राखण्यासाठी संवत्सराच्या शेवटच्या दिवशी उपरिचर राजाने ती काठी जमिनीत रोवली व दुसऱ्या दिवशी, म्हणजे नवीन संवत्सराच्या पहिल्या दिवशी, शेल्यासारखे वस्त्र बांधून तिची पूजा केली. ही काठीची पूजा म्हणजेच इंद्राची पूजा होय. या कथेतील रुपके उलगडत नाहीत पण यात गुढीपाडव्याच्या प्रथेचे मूळ स्पष्ट दिसते.

तर मंडळी, आपण उभारलेली मायबोली मेळावारूपी प्रेमाची व एकजुटीची ही गुढी आपल्या मनात सतत उंचावत राहो व हे नवीन वर्ष सर्वांना अत्यंत सुखाचे आणि भरभराटीचे जावो हीच या शुभदिनी प्रार्थना!

आपली,

मेधा फडणीस.

मायबोली मेळावा कार्यकारिणी २०११–१२

अध्यक्ष
संजीव पोतदार

उपाध्यक्ष
देवदत्त बेंद्रे

सचिव
अनिरुध्द जोशी

उप सचिव
सुनील जाखडी

कोषाध्यक्ष
शैलेंद्र परांजपे

उप कोषाध्याक्ष
वर्षा कोलंबेकर

सांस्कृतिक कार्यक्रम
शीला केदार
वर्षा कोळंबेकर

भोजन व्यवस्था
रश्मी देशमुख
शिरीष घडे

कार्यक्रम व्यवस्था
शिरीष घडे

मायबोली मेळावा वृत्त

संपादक:
मेधा फडणीस

सहसंपादक:
रश्मी देशमुख

मांडणी सजावट:
नूतन कुलकर्णी
मंजुषा नाईक

प्रकाशक:
MMTB Inc

फ्लोरिडातील संक्रांत

इये फ्लोरिडाचिये नगरी
स्थितस्य मंडळी मराठी खरी!
"मायबोली मेळावा" वेळोवेळी
तिळगुळाचा स्नेह यावेळी!!
भेट माझी पहिलीच नवखी
नाही वाटली किंचितही परकी!
प्रवेशद्वार मराठी, स्वागतही मराठीतून
मन भारावले कारण नमस्कार वाकून!!
मीही मोकळी, हातचा नाही राखला
मनापासून भरभरून आशीर्वाद दिला!
मंडळाचे सदस्य '(शिष्ट(स्त)' तर होते
पण 'शिष्ठ'पणा नाही, अगत्य दिसते!!
बालगंधर्व आणि किर्लोस्कर कंपनी
कारकीर्द उलगडण्यात रंगली वडील मंडळी!
करण्यासारखे नव्हते काहीच
कंटाळली का छोटी मंडळी?!!
तितक्यात बोरनहाण बाळाला
मजा खाऊ गोळा करायला!
खाऊसोबत धराव परंपरेच बोट
तिळगुळासोबत हवा माहितीचा घोट!!

छोटा फराळ, चहा, कॉफी आली तरतरी
विश्रांतीसाठी वेळ मिळाला मध्यांतरी!
हळदीकुंकू, वाण, गुलाब टपोरा
अत्तरदाणी, गुलाबदाणी यांचा वर तोरा!!
यातच दिमाखला असता खरा
नऊवारी, नथ, उखाणा, गजरा!
अंगड रुपड बदललेली बोली
पण बोलीची माया किती ओली!!
change झालेला **accent**
वागणूकही तितकीच **decent!**
स्वादिष्ट 'बुफे' असला तरी रंगली पंगत
आग्रहासोबतच नवनवीन संगत!!
असे स्नेही, अशी मुले आजुबाजू असताना
बेचैन का वाटेल - परदेशी राहताना!
लाभूदे साऱ्यांना देवाचे लळीत
यशस्वी होवोत उपक्रम सगळे,
कळावे, लोभ असावा, आपली मायबोलिक
सौ. अनुराधा सतीश वाबळे.

नमस्कार मंडळी,

दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षीदेखील **F.I.A.** ने टॅम्पा बे मधील जवळ जवळ चाळीस विविध मंडळांच्या मदतीने भारतीय प्रजासत्ताक दिन मोठया धुमधडाक्याने साजरा केला. ह्या सोहळ्याला टॅम्पा बे चे कमिशनर **Mr. Kevin Beckner,** टॅम्पा बे चे मेयर **Mr. Bob Buckhorn** आणि सर्व मंडळांचे सभासद मोठया संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कमिशनरांच्या हस्ते झेंडावंदन आणि राष्ट्रगीत, तसेच विविध देशभक्तीपर गीते गावून करण्यात आली. प्रत्येक कार्यकारिणीने आपापल्या प्रांतातील विविध महत्वपूर्ण गोष्टींचे अतिशय सुंदर प्रदर्शन मांडून त्यांची माहिती व महत्व पुढील नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचा काटेकोर प्रयत्न केला. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या थोर नेत्यांची माहिती, आपल्या प्रांताची भौगोलिक रचना, इतिहास, वेशभूषा, आहार वगैरे, जणू भारताचा खजिनाच समोर उलगडला गेला. ते सर्व आनंदी वातावरण आणि देखावा नजरेसमोरून एखादया चलतचित्राप्रमाणे सरकत असताना क्षणभर भारतात असल्याचाच भास झाला. *.....पुढील पानावर....*

मायबोली मेळावा वृत्त

'Unity in diversity' ह्या संकल्पनेवर आधारित प्रदर्शनात सौ. कविता तायवाडे, सौ. प्रज्ञा मुळे आणि सौ. रश्मी देशमुख ह्यांनी अस्सल महाराष्ट्रीयन पदार्थांनी भरलेले ताट मांडून लज्जत वाढवली.
ह्या सर्वावर पर्वणी होती ती सांस्कृतिक कार्यक्रमांची! लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनीच भारताबद्दल वाटणाऱ्या आपल्या भावना, प्रेम, गाणे व नृत्यांमधून सादर करण्याचा निर्व्याज्य प्रयत्न केला.

F.I.A. ने रांगोळी, पाककला, निबंध, नृत्य, गाणी, अशा अनेकविध स्पर्धा आयोजित करुन कार्यक्रमाची रंगत अजूनच वाढवली. आपल्या मायबोली मेळाव्याचे सदस्य श्री. अतुल तायवाडे ह्यांची रांगोळी स्पर्धेत परीक्षक म्हणून निवड झाली. ह्या स्पर्धांमधून मायबोली मेळाव्याच्या काही उत्साही मंडळीनी सहभाग घेऊन महाराष्ट्राची शान वाढवली आणि पारितोषिकेही पटकावली.

पारितोषिकांचे मानकरी....
पाककलास्पर्धा प्रथम पारितोषिक...सौ. माधुरी वैद्य.
रांगोळीस्पर्धा प्रथम पारितोषिक ...सौ. विद्या घडे.
निबंधस्पर्धा तृतीय पारितोषिक...सानिका फडणीस.
नृत्यस्पर्धा (वयोगट आठ ते दहा) तृतीय पारितोषिक ..रिया पितळे, अमृता पेडणेकर, अलिशा कुलकर्णी, आणि उर्मी थोरात.
नृत्यस्पर्धा तृतीय पारितोषिक ....श्री.व सौ. पोतदार, श्री. व सौ. तायवाडे, श्री व सौ. घडे, श्री. व सौ. मुळे, श्री. व सौ. देशमुख, आणि श्री. व सौ. खानविलकर.

अवनी देशपांडे, अमृता पोतदार, श्रीया देशमुख, आणि निकिता घडे ह्यांनी सादर केलेल्या लावणी नृत्याने प्रेक्षकांची वाहवा मिळवली. सर्व विजेत्यांचे आणि सहभागी कलाकारांचे हार्दिक अभिनंदन.

डॉ. श्री. सतिश अंकलीकर, श्री. जयंत देशपांडे, सौ. सुप्रिया थोरात, श्री. प्रसाद कुलकर्णी व उत्तरा भालेराव ह्यांनी सुरेल आवाजात देशभक्तीपर गीते सादर केली. आपापल्या प्रांतातील पारंपारिक वेशभूषेत सजलेल्या स्त्रियांनी 'भारतमाता' ह्या अप्रतिम कार्यक्रमाने सोहोळ्याची सांगता केली.

ह्या संपूर्ण सोहळ्यात मायबोली मेळाव्याचा लक्षणीय आणि सर्वांगसुंदर सहभाग यशस्वी होण्यासाठी मायबोलीचे अध्यक्ष श्री. संजीव पोतदार यांनी सभासदांना उत्तेजन दिले. तसेच डॉ. श्री. गिंडे, श्री तायवाडे, श्री. बेंद्रे, श्री.कोलंबेकर, आणि फडणीस कुटुंबिय यांनी केलेल्या मदतीसाठी धन्यवाद.

त्याचप्रमाणे दरवर्षी ह्या कार्यक्रमात मायबोलीच्या जास्तीत जास्त सभासदांनी भाग घेऊन महाराष्ट्राची कीर्ती वाढवीत राहावे आणि मराठी पाऊल पुढे पडत राहावे हीच सदिच्छा!
सौ. वर्षा कोलंबेकर.

Congratulations.....!

Tanvi Pendharkar is a sophomore at the University of Florida in Gainesville. She is a proud member of the UF marching band where she plays the trumpet. The UF marching band has been invited by the City of London to play in the Olympics this summer. They will be there for 10 days & will play in various Olympic events throughout London. The band will also get a chance to do some sightseeing while they are there.



Salil has been announced as one of the 15000 National Merit finalists, chosen from approximately 1.5 million high school students in some 22000 high schools who entered the 2012 National Merit Scholarship program. To become a finalist, a semifinalist must have an outstanding PSAT score, and a strong academic record throughout high school, be endorsed and recommended by the high school principal, and earn SAT scores that confirm the earlier PSAT.

Rhea's artwork was selected among 4 others from her entire school for the cover of the student directory. Hers was 2nd place. Rhea was also on this year's Tivitz team of 4, selected from all 4th grade classes in her school. They won 2nd place out of 30 schools and will be going to the state finals. She was on the Math bowl team, which came in 7th place out of 40 schools.

Rhea also won the 1st place prize in an essay writing competition organized by TAMAUSA, a competition based in the Indian community. She also got 1st class high honor in the RCM (Royal Conservatory of Music) theory exam. She is the youngest in her group that appeared for the 4th level exam, the other kids are middle school and above. She was also selected to play at State level competition held in Jacksonville for piano.

Rhea's dance group won the 1st place prize in Orlando's dance competition for "Rangeelo Nach" in best choreography and best costume categories.